वाचले:- 1. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1312/प्र.क्र.510/नापु-31,दि.5.3.14 दर व मार्जीन.
2.म. अव्वर सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रं.असुका-2014/प्र.क्रं.7/नापु-22,दि.3.4.14
3.म.उपसचिव , अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई यांचे पत्र क्रं. अधापु-2016//प्र.क्रं .22/ना.पु.22,दिनांक **02 मे 2016** नुसार
4.म.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र पुरवठा/हालचाल/राअसु/ऑगस्ट-16/निडीओ/ईटपाल/9/40/5134, दि.1.07.2016
5. जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगांव यांचे पत्र क्र.पुरवठा/स्वधादु/कावि/9/39/28181/2016 दि. 22.06.2016.

********

क्रं.पुरवठा/हालचाल/राअसु/अंयो/नियतन/ईटपाल/2016/9/40/5403
जिल्हाधिकारी जळगांव यांचे कार्यालय,
दिनांक 05 .07.2016

**आदेश**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम 2013 अंतर्गत म.उपसचिव , अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई यांचे पत्र क्रं.अधापु-2016/प्र.क्रं.22/ना.पु.22,दिनांक **02 मे 2016** अन्वये मी जिल्हाधिकारी जळगांव माहे **ऑगस्ट 2016** करिता, जळगांव जिल्हयाकरीता अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत सद्यस्थितीतील सुधारित कार्डसंख्या 136977 विचारात घेवून प्रती कार्ड गहू 21 किलो प्रमाणे एकुण गहू 28760 क्विं. व तांदुळ प्रती कार्ड 14 किलो प्रमाणे एकूण तांदुळ 19170 क्विं. धान्याचे नियतन प्रती कार्ड 35 किलो प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे. तसेच मौजे रुईखेडा, चारमळी व साग्यादेव ही आदिवासी गांवे यावल तालुक्यातीलच असलेने पूर्वी लाभार्थ्यांना धान्य वाटपास सोईचे व्हावे म्हणून रावेर तालुक्यास जोडण्यात आले होते. परंतु सदर गावांना यावल तालुक्यातून धान्य पुरवठा व्हावयास पाहिजे म्हणून उक्त गांवे रावेर तालुक्यातून कमी करुन यावल तालुक्यातील महसूली गावांस जोडणेबाबत उपोदघातातील पत्र क्र. 5 अन्वये कळविण्यात आले होते. सदर गावांची अंत्योदय कार्ड संख्या 61 आहे. त्यानुसार सद्यस्थितीत रावेर तालुक्यातील अंत्योदय कार्ड संख्या 6966 आहे. तसेच यावल तालुक्यातील अंत्योदय कार्ड संख्या 10988 आहे.

म. व्यवस्थापक,भारतीय खाद्य निगम महामंडळ मनमाड यांचेकडून अंत्योदय अन्न योजनेतील **गहू 28760 क्विं. डी.ओ. क्रमांक 1181** दिनांक02.07.2016 व **तांदुळ 19170.00 क्विं. डी.ओ.क्रं. 1182** दि.02.07.2016 नुसार दोनही धान्याचे डिओ MSWC जळगांव गोदामातून दिनांक **31.07.2016** पावेतो उचल करण्यासाठी प्राप्त झाले आहेत.

स्वस्तधान्य दुकान संकलनाकडील पत्र क्रमांक पुरवठा/स्वधादु/कावि/9/39/3723/2015,दि.30.04.2015 नुसार जळगांव जिल्हयाची **अन्त्योदय योजनेतील लाभार्थी कार्ड संख्या 136977** असल्याचे कळविले आहे. त्यानुसार मी जिल्हाधिकारी जळगांव या आदेशाव्दारे अन्त्योदय अन्न योजनेअंतर्गत माहे **ऑगस्ट 2016** करिता प्रती कार्ड गहू 21 किलो व तांदुळ 14 किलो प्रमाणे, गहू रु. 2 प्रती किलो आणि तांदुळ रु. 3 प्रती किलो प्रमाणे स्वस्तधान्य दुकानदारामार्फत लाभार्थ्यांना वितरीत करण्यास तहसिलदार यांना खालील 100%मासिक नियतनास मंजूरी देत आहे.

| अ.क्रं. | तालुका | अंत्योदय कार्डसंख्या | माहे ऑगस्ट २०१६ करिता मंजूर नियतन | |
|---|---|---|---|---|
| | | | गहू | तांदुळ |
| १ | जळगांव | १३८०५ | २८९९ | १९३२ |
| २ | जामनेर | १०४७२ | २१९९ | १४६५ |
| ३ | एरंडोल | ६०४४ | १२६९ | ८४६ |
| ४ | धरणगांव | ६९२९ | १४५५ | ९७० |
| ५ | भुसावळ | ५१४५ | १०८० | ७२० |
| ६ | बोदवड | ४०८८ | ८५९ | ५७२ |
| ७ | यावल | १०९८८ | २३०७ | १५३८ |
| ८ | रावेर | ६९६६ | १४६२ | ९७४ |
| ९ | सावदा | ३५४६ | ७४४ | ४९६ |
| १० | मुक्ताईनगर | ८०९८ | १७०१ | ११३३ |
| ११ | पाचोरा | ९८३२ | २०६३ | १३७६ |
| १२ | भडगांव | ७२५६ | १५२४ | १०१५ |
| १३ | चाळीसगांव | १७२९३ | ३६३१ | २४२१ |
| १४ | अमळनेर | ९१९८ | १९३१ | १२८७ |
| १५ | पारोळा | ७२५४ | १५२३ | १०१६ |
| १६ | चोपडा | १००६३ | २११३ | १४०८ |
| एकुण क्विं. | | १३६९७७ | २८७६० | १९१७० |

उपरोक्त नियतन मंजूरीचे आदेशानुसार, तालुक्यातील स्वस्तधान्य दुकान निहाय नियतन काढतांना खालील निर्देशांचे तंतोतंत पालन सर्व तहसिलदार यांनी करावे.

1. धान्याची ट्रक आल्यानंतर त्यातील धान्य विनाविलंब गोदामात उतरवून घ्यावे.
2. गोदामात उतरविणेत आलेल्या धान्याचे नियमानुसार प्रमाणीकरण ज्या त्या दिवशीच करणेत यावे.
3. मंजूर करणेत आलेल्या नियतनापेक्षा जास्त धान्य प्राप्त झाल्यास, सदरचे धान्य गोदाम व्यवस्थापकाने उतरवून घेऊ नये. असे निदर्शनास आल्यास संबंधीत गोदाम व्यवस्थापकास /किपर जबाबदार धरणेत येईल. व त्यावरील येणारा सर्व खर्च संबंधितांकडून वसुल करणेत येईल.
4. गोदामातील धान्य साठा वितरण करतांना प्रथम गोदामातील जुना साठा First in first out या पध्दतीप्रमाणे वितरीत करावा. जेणे करुन जुना धान्य साठा जास्त दिवस पडून खराब होणार नाही किंवा त्यात तुट येणार नाही.
5. वाहतूक प्रतिनिधी यांनी उपरोक्त नियतनानुसारच तालुकानिहाय समप्रमाणात धान्य पाठवावे.
6. संबंधीत तहसिलदार यांनी उपयोगीता प्रमाणपत्र नियमीतरित्या जिल्हा कार्यालयातील संबंधीत संकलनाकडेस पाठवावे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत आदेश 2001 नुसार उपयोगीता प्रमाणपत्र सादर न केल्यास व त्या अभावी पुढील महिन्यात शासनाकडून धान्य न मिळाल्यास त्याची जबाबदारी आपणावर राहिल.
7. पुरवठा तपासणी अधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, जळगांव यांना माहितीसाठी व तात्काळ कार्यवाहीसाठी
   2/-. अन्नमहामंडळाचे प्रतिनिधी व आपण असे दोघासमवेत संयुक्त तपासणी करावी. व अहवाल सादर करावा.
8. धान्याचे वितरण करते वेळी धान्याचा नमुना तपासणेत यावा. धान्य खराब नसल्याची खात्री केले नंतरच स्वस्त धान्य दुकानदार यांना धान्य वितरीत करावे.
9. वाहतूक प्रतिनिधी यांनी धान्य उचल करण्या अगोदर धान्याचा दर्जा चांगला आहे किंवा नाही याची खात्री करावी. त्यासाठी अन्नमहामंडळाचे प्रतिनिधी समवेत संयुक्तरित्या तपासणी करावी व तसा रिपोर्ट सादर करावा.
10. मंजूर नियतनानुसार धान्य सर्व तालुक्यांना त्यांचे गोदामात पाठवावे. व धान्य व्यपगत होणार नाही याची दक्षता घ्यावी.
11. तालुक्यात स्वस्तधान्य दुकानदार निहाय रजिष्टर ठेऊन सदस्य संख्या /कार्डसंख्या विचारात घेऊन तहसिलदार यांनी नियतन मंजूर करावे. व नियतनाची एक प्रत व **पीडीएफ प्रत** तात्काळ सादर करावी.
12. गोदामातील शिल्लक साठा विचारात घेऊन स्वस्तधान्य दुकानदार यांना परमीट वितरीत करणेत यावेत. गोदामात धान्य साठा शिल्लक नसतांना आगाऊ परमिट देण्यात येऊ नयेत.
13. एका योजनेतील धान्य दुस-या योजनेत वर्ग करावयाचे असल्यास तसा प्रस्ताव या कार्यालयात शासन निर्देशानुसार सादर करावा व मंजूरी मिळालेनंतरच धान्य वर्ग करावे. तसेच ज्या योजनेतील धान्य वर्ग करुन घेतले आहे ते धान्य ज्यावेळेस प्राप्त होईल त्यावेळेस प्राधान्याने ते धान्य त्याच योजनेत वर्ग करुन समायोजीत करणेची कार्यवाही करावी. अन्यथा संबंधीतांना जबाबदार धरणेत येईल.
14. **माहे सप्टेंबर 2016 चे धान्याची मागणी दिनांक 25.07.2016 चे पुर्वी स्वाक्षरीनिशी सादर करण्यात यावी. मागणी प्राप्त न झाल्यास** पुढील महिन्याचे नियतन मंजूर करण्यात येणार नाही, तसेच शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

(रुबल अग्रवाल)
o/c जिल्हाधिकारी जळगांव

प्रत :- म. उप सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,ना.पू. 22 , मंत्रालय विस्तार मुंबई 32 यांना माहितीसाठी सविनय सादर
प्रत:- म. उप आयुक्त, (पुरवठा),नाशिक विभाग नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत:- म. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, NIC, जळगांव यांना माहितीसाठी व सदरचे नियतन जिल्हयाचे संकेतस्थळावर प्रसिध्दी साठी.
प्रत:- उप विभागीय अधिकारी, जळगांव, भुसावळ,फैजपूर,एरंडोल, अमळनेर, पाचोरा, चाळीसगांव यांना माहितीसाठी
प्रत:- तहसिलदार जळगांव, जामनेर, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल, रावेर, एरंडोल, धरणगांव, पारोळा, अमळनेर, चोपडा, पाचोरा, भडगांव, चाळीसगांव यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत:- गोदाम व्यवस्थापक/किपर/पुरवठा हिशोब अ.का. जळगांव, जामनेर, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल, रावेर, एरंडोल, धरणगांव, पारोळा, अमळनेर, चोपडा, पाचोरा, भडगांव, चाळीसगांव यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत:- व्यवस्थापक, भारतीय खाद्य निगम अंतर्गत महा.राज्य वखार महामंडळ,जळगांव/अमळनेर /मे.किर्ती पब्लीशर प्रा.लि.मपूराबाद यांना माहितीसाठी
प्रत:- पुरवठा तपासणी अधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, जळगांव यांना माहितीसाठी

2/-अन्नमहामंडळाच्या गोदामातून माहे ऑगस्ट 2016 चे धान्य गहू व तांदुळ महामंडळाचे गोदामातून उचल करण्यापुर्वी शासनाच्या निर्देशानुसार अन्नमहामंडळाचे प्रतीनिधिसमवेत संयुक्तरित्या धान्याचे नमुने घेण्यात यावेत धान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक धान्य FAQ असल्याची खात्री करुनच धान्याची उचल करण्यात यावी .धान्याची उचल पूर्ण झाल्यानंतर संयुक्तरित्या तपासणीचे वेळी उपस्थित असलेल्या भारतीय अन्न महामंडळाच्या व जिल्हाधिकारी जळगांव यांचे प्रतीनिधी ची नावे व त्यांचे पद स्वाक्षरी खाली असावीत व तपासणीचा दि. आणि स्थळ इ. चा संपूर्ण तपासणीच्या रिपोर्टसह माहिती शासनास सादर करण्यात यावी. त्याशिवाय पुढील महिन्याचे नियतन शासन मंजूर करणार नसल्याचे कळविले आहे. करिता सदर तपासणीची माहिती प्राप्त करुन तात्काळ शासनास सादर करण्यात यावी.तसे संबंधीत संकलनाकडे अवगत करावे.

प्रत:- धान्य वाहतूक प्रतिनिधी जळगांव,अमळनेर ,किर्ती यांना माहितीसाठी रवाना.

2/-डी.ओ.निहाय दैनंदिन टी.पी.सह Statement II मध्ये अचूक माहिती भरुन इकडील कार्यालयात दररोज सादर करण्यात यावी. त्या अद्यापही आपण सादर करीत नाहीत त्यामुळे माहितीचा ताळमेळ घेता येत नाही.

प्रत:- मे.राज ट्रान्सपोर्ट कं.लातूर, धान्य वाहतूक ठेकेदार यांना माहितीसाठी व धान्याची उचल दि.31.07.2016 पावेतो मुदतीत करण्यासाठी रवाना.

2/-धान्याची उचल मुदतीत करण्यात यावी.धान्य व्यपगत केल्यास व्यपगत धान्याच्या बाजारभाव किमतीच्या 10% दंड रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.याची नोंद घ्यावी.तालुक्याचे गोदामात धान्य मंजूर आदेशाप्रमाणेच पोहोच करण्यात यावे.तालुक्यास धान्य पोहोचल्याची खात्री करण्यात यावी.

(रुबल अग्रवाल)
o/c जिल्हाधिकारी जळगांव

वाचले:- 1.म.उप सचिव, अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग यांचे शा.नि.क्रं.अधापु-1101/प्र.क्रं.1819/नापु- 22,मुंबई 400 032, दि 21 8.2001.
2. म. कक्ष अधिकारी,अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, ना.पु.22, मुंबई 32 यांचे शासन पत्र क्रं.अधापु-2013/प्र.क्रं.106,दि 3.6.13
3. म. अवर सचिव, अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मुंबई 32 यांचे शासन पत्र क्रं.अधापु-2013/ प्र.क्रं.66/ना.पु.22,दि 22.8.13
4. म.अवर सचिव अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय -मुंबई , यांचे पत्र क्र.असुका-2014/प्रक्र7/नापु-22 दि. 3 एप्रिल 2014 व शासन निर्णय क्रं. संकीर्ण-1312/प्रक्रं.510/नापु-31,दि. 5.3.14 नुसार मार्जीन व दर बाबत .
5. म. उप सचिव , अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई 32 यांचे शासन पत्र क्रं अधापु-2016/प्र.क्रं.22/ ना.पु.22, दिनांक **02.05.2016**
6. म.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्रं.पुरवठा/हालचाल/राअसु/प्राकुयो/डीओ/ऑग.-16/ईटपाल/9/40/5133 **दि.01.7.16**
7. जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगांव यांचे पत्र क्र.पुरवठा/स्वधादु/कावि/9/39/28181/2016 दि. 22.06.2016.

********

क्रं.पुरवठा/हालचाल/राअसु/प्राकुयो/नि/ऑग.-16/ईटपाल/2016/ 9/40/5404
जिल्हाधिकारी जळगांव यांचे कार्यालय,
दिनांक 4 .07.2016

**आदेश**

म.उप सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे शासन पत्र क्रमांक.अधापु - 2016/प्र.क्रं.22/ना.पु.22, मंत्रालय विस्तार मुंबई 32, दिनांक **02.05.2016** अन्वये जळगांव जिल्हयासाठी प्राधान्य कुटुंब योजनेकरिता सदस्य संख्या 2214290 विचारात घेवुन माहे ऑगस्ट 2016 क्रिता गहु 6643.00 मे.टन व तांदुळ 4429.00 मे.टन मंजूर करण्यात आले आहे.

तसेच मौजे रुईखेडा, चारमळी व साग्यादेव ही आदिवासी गांवे यावल तालुक्यातीलच असलेने पूर्वी लाभार्थ्यांना धान्य वाटपास सोईचे व्हावे म्हणून रावेर तालुक्यास जोडण्यात आले होते. परंतु सदर गावांना यावल तालुक्यातून धान्य पुरवठा व्हावयास पाहिजे म्हणून उक्त गांवे रावेर तालुक्यातून कमी करुन यावल तालुक्यातील रुईखेडा या महसूली गावांस जोडणेबाबत उपोदघातातील पत्र क्र. 6 अन्वये कळविण्यात आले होते. सदर गावांची प्राधान्य कुटुंब सदस्य संख्या 100 आहे. त्यानुसार सद्यस्थितीत रावेर तालुक्यातील प्राधान्य कुटुंब सदस्य संख्या 116194 आहे. तसेच यावल तालुक्यातील प्राधान्य कुटुंब संख्या 170174 आहे.

स्वधादु संकलनाकडील पत्र क्रं.पुरवठा/स्वधादु/कावि/9/39/17469/2015 दि. 23.12.2015 अन्वये जळगांव जिल्हयाची तालुकानिहाय सुधारित **प्राधान्य कुटुंब लाभार्थी इष्टांक/संख्या 2214290** असल्याचे कळविले आहे. सदर लाभार्थी संख्या विचारात घेवून **म. व्यवस्थापक, भारतीय खाद्य निगम महामंडळ, मनमाड** यांचेकडून माहे **ऑगस्ट 2016** साठी **प्राधान्य कुटूंब लाभार्थी योजना गहू 557.00 मे.टन डि.ओ.क्र. 1183 दि. 2.7.2016 नुसार** MSWC अमळनेर गोदामातुन व 6086.00 मे.टन डि.ओ. **क्र. 1184 दि. 2.7.2016** नुसार MSWC जळगांव गोदामातुन व **तांदूळ 410.000** मे.टन डी.ओ. क्रं. **1185** दि. 02.07.2016 नुसार MSWC अमळनेर गोदामातुन व **4019.000** मे.टन डी.ओ. क्रं. **1186** दि. 02.07.2016 नुसार MSWC जळगांव गोदामातुन दि. 31.07.2016 पावेतो उचल करण्यासाठी प्राप्त झालेला आहे.

**प्राधान्य कुटूंब लाभार्थी योजनेतील** खालीलप्रमाणे तालुकानिहाय लाभार्थी संख्या **2214290** विचारात घेवून मी जिल्हाधिकारी जळगांव या आदेशान्वये प्रती सदस्य गहू 3 किलो व तांदुळ 2 किलो असे एकुण 5 किलो धान्य, गहू रु. 2 प्रती किलो आणि तांदुळ रु. 3 प्रती किलो प्रमाणे स्वस्तधान्य दुकानदारामार्फत **माहे ऑगस्ट 2016** करिता **PHH(S) व PHH सदरस्य संख्येनुसार** धान्य वितरीत करण्यास तहसिलदार यांना मंजुरी देत आहे.

| प्राधान्य कुटूंब योजनेअंतर्गत माहे ऑगस्ट 2016 करिता मंजूर नियतन | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्रं. | तालुका | PHH (S) सदस्य संख्या | PHH सदस्य संख्या | प्राधान्य कुटुंब एकुण सदस्य संख्या | PHH (S) नियतन | | PHH नियतन | | PHH एकुण नियतन | |
| | | | | | गहु | तांदुळ | गहु | तांदुळ | गहु | तांदुळ |
| 1 | जळगांव | 121950 | 185916 | 307866 | 3659 | 2439 | 5577 | 3718 | 9236 | 6157 |
| 2 | जामनेर | 103970 | 96059 | 200029 | 3119 | 2079 | 2882 | 1921 | 6001 | 4001 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | एरंडोल | 30485 | 61449 | 91934 | 915 | 610 | 1843 | 1229 | 2758 | 1839 |
| 4 | धरणगांव | 37082 | 57351 | 94433 | 1112 | 742 | 1721 | 1147 | 2833 | 1889 |
| 5 | भुसावळ | 75769 | 100167 | 175936 | 2273 | 1515 | 3005 | 2003 | 5278 | 3519 |
| [illegible] | बोदवड | 34095 | 16193 | 50288 | 1023 | 682 | 486 | 324 | 1509 | 1006 |
| 7 | यावल | 84142 | 56032 | 140174 | 2524 | 1683 | 1681 | 1121 | 4205 | 2803 |
| 8 | रावेर | 52766 | 63428 | 116194 | 1583 | 1055 | 1903 | 1269 | 3486 | 2324 |
| 9 | सावदा | 23428 | 38179 | 61607 | 703 | 469 | 1145 | 764 | 1848 | 1232 |
| 10 | मु.नगर | 76244 | 14968 | 91212 | 2287 | 1525 | 449 | 299 | 2736 | 1825 |
| 11 | पाचोरा | 33596 | 127832 | 161428 | 1008 | 672 | 3835 | 2557 | 4843 | 3229 |
| 12 | भडगांव | 37010 | 43879 | 80889 | 1110 | 740 | 1316 | 878 | 2427 | 1618 |
| 13 | 40 गांव | 142734 | 62829 | 205563 | 4282 | 2855 | 1885 | 1257 | 6167 | 4112 |
| 14 | अमळनेर | 97103 | 64233 | 161336 | 2913 | 1942 | 1927 | 1285 | 4840 | 3227 |
| 15 | पारोळा | 64591 | 41740 | 106331 | 1938 | 1292 | 1252 | 835 | 3190 | 2127 |
| 16 | चोपडा | 95070 | 74000 | 169070 | 2852 | 1901 | 2220 | 1480 | 5072 | 3382 |
| एकुण क्विं. | | 1110035 | 1104255 | 2214290 | 33301 | 22201 | 33128 | 22085 | 66429 | 44288 |
| एकुण मे.टन | | | | | 3330 | 2220 | 3313 | 2209 | 6643 | 4429 |

उपरोक्त नियतन मंजूरीचे आदेशानुसार, तालुक्यातील स्वस्तधान्य दुकान निहाय नियतन काढतांना खालील निर्देशांचे तंतोतंत पालन सर्व तहसिलदार यांनी करावे.

1. धान्याची ट्रक आल्यानंतर त्यातील धान्य विनाविलंब गोदामात उतरवून घ्यावे.
2. गोदामात उतरविणेत आलेल्या धान्याचे नियमानुसार प्रमाणीकरण ज्या त्या दिवशीच करणेत यावे.
3. योजनानिहाय गहू/तांदुळ या धान्याच्या स्वतंत्र थप्प्या गोदामात सुटसुटीत लावणेत याव्यात .
4. मंजूर करणेत आलेल्या नियतनापेक्षा जास्त धान्य प्राप्त झाल्यास, सदरचे धान्य गोदाम व्यवस्थापकाने उतरवून घेऊ नये. असे निदर्शनास आल्यास संबंधीत गोदाम व्यवस्थापकास /किपरला जबाबदार धरणेत येईल. त्यावरील येणारा सर्व खर्च संबंधितांकडून वसुल करणेत येईल.
5. गोदामातील धान्य साठा वितरण करतांना प्रथम गोदामातील जुना साठा First in first out या पध्दतीप्रमाणे वितरीत करावा. जेणे करुन जुना धान्य साठा जास्त दिवस पडून खराब होणार नाही किंवा त्यात तुट येणारनाही.
6. वाहतूक प्रतिनिधी यांनी उपरोक्त नियतनानुसारच तालुकानिहाय समप्रमाणात धान्य पाठवावे.
7. संबंधीत तहसिलदार यांनी उपयोगीता प्रमाणपत्र नियमीतरित्या जिल्हा कार्यालयातील संबंधीत संकलनाकडेस पाठवावे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत आदेश 2001 नुसार उपयोगीता प्रमाणपत्र सादर न केल्यास व त्या अभावी पुढील महिन्यात शासनाकडून धान्य न मिळाल्यास त्याची जबाबदारी आपणावर राहिल.
8. धान्याचे वितरण करते वेळी धान्याचा नमुना तपासणेत यावा. धान्य खराब नसल्याची खात्री केले नंतरच स्वस्त धान्य दुकानदार यांना धान्य वितरीत करावे.
9. पुरवठा निरिक्षक ,धान्य वाहतूक प्रतिनिधी यांनी डी.ओ.नुसार धान्य उचल करण्या अगोदर धान्याचा दर्जा चांगला आहे किंवा नाही याची खात्री करावी. त्यासाठी अन्नमहामंडळाचे प्रतिनिधी समवेत संयुक्तरित्या तपासणी करावी व तसा रिपोर्ट सादर करावा.
10. मंजूर नियतनानुसार धान्य सर्व तालुक्यांना त्यांचे गोदामात पाठवावे. व धान्य व्यपगत होणार नाही याची दक्षता घ्यावी.
11. तालुक्यात स्वस्तधान्य दुकानदार निहाय रजिष्टर ठेऊन सदस्य संख्या /कार्डसंख्या विचारात घेऊन तहसिलदार यांनी नियतन मंजूर करावे. नियतनाची एक प्रत व सर्व नियतनाची एक पीडीएफ तयार करुन सादर करावी.

12. गोदामातील शिल्लक साठा विचारात घेऊन स्वस्तधान्य दुकानदार यांना परमीट वितरीत करणेत यावीत.गोदामात धान्य साठा शिल्लक नसतांना आगाऊ परमिट देण्यात येऊ नयेत.

13. एका योजनेतील धान्य दुस-या योजनेत वर्ग करावयाचे असल्यास तसा प्रस्ताव या कार्यालयात शासन निर्देशानुसार सादर करावा व मंजूरी मिळालेनंतरच धान्य वर्ग करावे. तसेच ज्या योजनेतील धान्य वर्ग करुन घेतले आहे ते धान्य ज्यावेळेस प्राप्त होईल त्यावेळेस प्राधान्याने ते धान्य त्याच योजनेत वर्ग करुन समायोजीत करणेची कार्यवाही करावी. अन्यथा संबंधीतांना जबाबदार धरणेत येईल.

14. माहे सप्टेंबर 2016 चे धान्याची मागणी दिनांक 25.07.2016 पावेतो सादर करण्यात यावी. मागणी प्राप्त न झाल्यास पुढील महिन्याचे नियतन मंजूर करण्यात येणार नाही.

(रूबल अग्रवाल)
जिल्हाधिकारी ,जळगांव

प्रत :- म. उप सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,ना.पु.22,मंत्रालय विस्तार , मुंबई 32 यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रत:- म. उप आयुक्त, (पुरवठा),नाशिक विभाग नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत:- म. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, NIC, जळगांव यांना माहितीसाठी व सदरचे नियतन जिल्हयाचे संकेतस्थळावर प्रसिध्दी साठी

प्रत:- उप विभागीय अधिकारी, जळगांव, भुसावळ,फैजपूर,एरंडोल, अमळनेर, पाचोरा, चाळीसगांव यांना माहितीसाठी

प्रत:- तहसिलदार जळगांव, जामनेर, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल, रावेर, एरंडोल, धरणगांव, पारोळा, अमळनेर, चोपडा, पाचोरा, भडगांव, चाळीसगांव यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत:- पुरवठा तपासणी अधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, जळगांव यांना माहितीसाठी

2/-अन्नमहामंडळाच्या गोदामातून माहे ऑगस्ट 16 चे गहू व तांदुळ उचल करण्यापुर्वी शासनाच्या निर्देशानुसार अन्नमहामंडळाचे प्रतीनिधिसमवेत सयुक्तरित्या धान्याचे नमुने घेण्यात यावेत धान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक असल्याची खात्री करुनच धान्याची उचल करण्यात येईल.धान्याची उचल पूर्ण झाल्यानंतर संयुक्तरित्या तपासणीचे वेळी उपस्थित असलेल्या भारतीय अन्न महामंडळाच्या व जिल्हाधिकारी जळगांव यांचे प्रतीनिधी ची नावे स्वाक्षरी खाली नमुद करावे व त्यांचे पद व तपासणीचा दि. आणि स्थळ इ.संपूर्ण तपासणीच्या रिपोर्टसह माहिती शासनास सादर करावयाची आहे- त्याशिवाय पुढील महिन्याचे नियतन शासन मंजूर करणार नसल्याचे कळविले आहे. करिता सदर तपासणीची माहिती प्राप्त करुन इकडील कार्यालयात तात्काळ सादर करण्यात यावी.

प्रत:- गोदाम व्यवस्थापक/किपर/पुरवठा हिशोब अ.का. जळगांव, जामनेर, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल, रावेर, एरंडोल, धरणगांव, पारोळा, अमळनेर, चोपडा, पाचोरा, भडगांव, चाळीसगांव यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत:- व्यवस्थापक, भारतीय खाद्य निगम अंतर्गत महा.राज्य वखार महामंडळ,जळगांव/अमळनेर /किर्ती गोदाम यांना माहितीसाठी रवाना

प्रत:- धान्य वाहतूक प्रतिनिधी जळगांव,अमळनेर, किर्ती पब्लीशर प्रा.लि.ममूराबाद यांना माहितीसाठी रवाना.

2/-डी.ओ.निहाय दैनंदिन टी.पी.सह Statement II मध्ये माहिती इकडील कार्यालयात दररोज सादर करण्यात यावी.

प्रत:- मे.राज ट्रॉन्पोर्ट कं.लातूर, धान्य वाहतूक ठेकेदार यांना माहितीसाठी व दि.31.07.2016 चे पुर्वी मुदतीत धान्याची उचल करण्यासाठी रवाना

2/-धान्याची उचल मुदतीत करण्यात यावी.धान्य व्यपगत केल्यास व्यपगत धान्याच्या बाजारभाव किमतीच्या 10% दंड रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.याची नोंद घ्यावी.करिता धान्याची उचल मुदतीत पूर्ण करावी.

(रूबल अग्रवाल)
जिल्हाधिकारी,जळगांव